**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २४३/२०२६**

महामार्ग पोलीस ककेंद्र रामटे

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे प्रकरण एकवीस संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा यांचे न्यायालयात**

१. **गुन्हा घडल्याची तारीख** - ०२.०३.२०२६.

२. **फिर्याद दाखल झाल्याची तारीख** - ०२.०३.२०२६

३. **फियादीचे नांव व पत्ता** - प्रभारी अधिकारी महामार्ग रामटेक

४. **आरोपीचे नांव व पत्ता** - **सुभान बशीर खान.**
व.व. ५०, व्यवसाय –..,
रा. ह.मु. वचभाई ताज नगर टेका,
कबड्डी ग्राउंडचे मागे.

५. **आरोपीत गुन्हा** - मोटर वाहन कायदा कलम ४/१२२, १७७-अ प्रमाणे

तुम्ही दि. ०२.०३.२०२६ रोजी दु. १३.०९ वाजणेचे सुमारास हायवे क्र. ५३ वर, त्याच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच. २४ जे ५३१८ अवैध ठिकणी वाहन उभे केले त्यामुळे तुम्ही मोटर वाहन कायदा कलम ४/१२२, १७७-अ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे असा तुमचेवर आरोप आहे.

६. **आरोपीचा जबाब** -

प्रश्न क्र.१ - तुम्हाला फिर्याद ची प्रत मिळाली का ?

उत्तर - होय.

प्रश्न क्र.२ - तुम्हाला आरोप वाचून दाखविण्यात आले ते समजले का ?

उत्तर - होय.

प्रश्न क्र.३ - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर - मला गुन्हा कबुल आहे.

दिनांक - १४.०३.२०२६

आरोपीची सही

समक्ष,

( एल. एम. पठाण )

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा

आरोपीने स्वतः अर्ज देवुन मोटर वाहन कायदा कलम ४/१२२, १७७-अ प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. सदरचा गुन्हा हा आरोपीचे हातुन पहिल्यांदाच घडलेला असून त्याने कमीत कमी दंडाची शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप तसेच आरोपीचे कबूलीचे कथन यांचा विचार करता आरोपीस द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचीत होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी - **सुभान बशीर खान,** यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये मोटर वाहन कायदा कलम ४/१२२, १७७-अ अंतर्गत दोषी ठरविणेत येत आहे.

२) आरोपीने मोटर वाहन कायदा कलम ४/१२२ या गुन्हयासाठी रक्कम रु ५००/- (अक्षरी रक्कम रु. पाचशे फक्त) द्रव्यदंड भरावा. दंड न भरलेस आरोपीस ७ (सात) दिवसांची साधी कैद सुनावणेत येत आहे.

३) दंड भरल्यानंतर आरोपीचे जप्त लायसन्स/ कागदपत्र त्यांना परत देणे.

( एल. एम. पठाण )

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा

मौदा

दि. १४.०३.२०२६

Fine Rs. 500/- Paid
Receipt No 269/26